कौटुंबिक न्यायालय, सातारा करिता फर्निचर सुविधेच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत .

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

शासन निर्णय क्रमांक: कौटुंन्या १११७/८९१/प्र.क्र.१९५/का.९

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- १५/११/२०१७

<u>संदर्भ</u> :- १) शासन निर्णय वित्त विभाग क्र. बीजीटी-२०.१०/प्र.क्र.६६/अर्थसंकल्प-२, दि.१०.०८.२०१०

२) शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग- २, दि.१७.४.२०१५

३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र.B(W) ६०४७ of १९८०/२४१९/२९६९१, दि.१५.०९.२०१७

४) जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा यांचे पत्र क्र.२५०९/२०१७, दि.२२.०६.२०१७

<u>प्रस्तावना</u> :-

प्रबंधक (निरीक्षणे-२), उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांनी दि.१५.०९.२०१७ च्या पत्रान्वये कौटुंबिक न्यायालय, सातारा हे कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक फर्निचर सुविधेच्या कामासाठी रु.१४,८१,९४१/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केलेली आहे. तसेच जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा यांनी दि.२२.०६.२०१७ च्या पत्रान्वये सदर कौटुंबिक न्यायालयासाठी आवश्यक फर्निचरबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांनी तयार केलेले अंदाजपत्रक सादर केले होते. त्यानुसार सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

कौटुंबिक न्यायालय, सातारा कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक कार्यालयीन फर्निचर व इतर कामे करण्याच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केल्यानुसार रु.१५,७७,९११/- (पंधरा लक्ष सत्त्यात्तर हजार नऊशे अकरा फक्त) इतक्या रकमेस खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

i. सदर प्रकरणी अंदाजपत्रकातील सेंटेज चार्जेस वगळून व वस्तु सेवाकराची तरतूद करुन अंदाजपत्रकाची किंमत रु.१५,७७,९११/- इतकी सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केलेली आहे.

ii. कौटुंबिक न्यायालय, सातारा करिता आवश्यक फर्निचर विहित प्रमाणीकृत आकारमानाचे असावे. ते महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तीकेच्या परिशिष्ट २६ मध्ये विहित केलेल्या फर्निचरच्या प्रमाणाच्या धर्तीवर आणि प्रत्यक्ष कर्मचारी वृंदांची संख्या विचारात घेऊन निश्चित करावे.

iii. याप्रकरणी नेहमीची कार्यपद्धती आणि इतर सर्वसाधारण निर्देशांचे अनुपालन करण्यात यावे.

२. याकरिता येणारा खर्च मागणी क्रमांक जे-१, २०१४-न्यायदान, १०२-उच्च न्यायालये, (१३) १४ व्या वित्त आयोगांतर्गत योजना, (१३)(०२) कौटुंबिक न्यायालये (अनिवार्य), संकेतांक क्रमांक (२०१४ ०६०१), १३-कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.६८९/इमा-२, दि.७/१०/२०१७ व वित्तीय अधिकार नियम पुस्तीका-१९७८, भाग-पहिला, उप विभाग-दोन मधील अ.क्र.३७, नियम क्र.९० अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१११५१५२१२३३५१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Santosh Sampatti Navagire

Digitally signed by Santosh Sampatti Navagire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=214b4345a2842afe7dd0cbda9e8d83579cbedaaaef30f215ceda096e4e407797, serialNumber=0cb1b0de020015cf6d1f800579271f4816460b1802c2ae247dd6dd6f47462cd3, cn=Santosh Sampatti Navagire
Date: 2017.11.15 15:25:00 +05'30'

(सं.सं. नवगिरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१) मा. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
२) प्रबंधक (निरीक्षणे १ व २), उच्च न्यायालय, मुंबई.
३) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सातारा.
४) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.
६) वित्त विभाग (व्यय/५), मंत्रालय, मुंबई
७) सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई
८) कार्यासन अधिकारी, कार्यासन २३/२४/२५, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती-का.९.